www.esakal.com
सकाळ

**8th December 2011**

# आशियाई चित्रपट महोत्सव २३ पासून

## 'केन्शो'चे संचालक गोविंद ठक्कर यांची माहिती

**सकाळ वृत्तसेवा**

पुणे, ता. ७ : दोन वर्षांनंतर पुन्हा एकदा पुणेकरांना आशियाई चित्रपटांचा रसस्वाद घेण्याची संधी मिळणार आहे. 'आशय' आणि 'केन्शो इव्हेंट - एंटरटेनमेंट' आयोजित "७ वा आशियाई चित्रपट महोत्सव' २३ ते २९ डिसेंबर या कालावधीत होणार आहे, अशी माहिती 'केन्शो'चे संचालक गोविंद ठक्कर यांनी मंगळवारी पत्रकार परिषदेत दिली. महोत्सवाचे संयोजक वीरेंद्र चित्राव आणि सतीश जकातदार या वेळी उपस्थित होते.

ठक्कर म्हणाले, ''महोत्सवामध्ये भारतासह १५ देशांतील सुमारे ८० पेक्षा अधिक चित्रपट दाखविले जाणार आहेत. त्यामध्ये सात मराठी चित्रपटांचा समावेश आहे. हे चित्रपट 'आयनॉक्स' चित्रपट गृह, 'राष्ट्रीय चित्रपट संग्रहालय', 'फिल्म ॲण्ड टेलिव्हिजन इन्स्टिट्यूट ऑफ इंडिया' आणि बाल शिक्षण मंदिर येथील 'एमईएस सभागृह' येथे दाखविले जातील. तरुणांना या महोत्सवासाठी जास्त प्राधान्य दिले जाणार आहे.''

आंतरराष्ट्रीय पारितोषिक प्राप्त चित्रपटाने महोत्सवाची सुरवात आणि नवीन मराठी चित्रपटाने समारोप होणार आहे. प्रादेशिक भाषेतील चित्रपटही दाखविले जातील. रवींद्रनाथ टागोर यांच्या १५०व्या जयंतीनिमित्त त्यांच्या कथांवरील चित्रपट हा विशेष भाग असेल. दिग्दर्शक व कलावंतांना या वेळी 'झेनिथ एशिया' सन्मान देण्यात येणार आहे. प्रवेश अर्ज आणि नोंदणी १० डिसेंबरपासून पाथफाइंडर येथे सुरू होईल, अशी माहिती चित्राव यांनी दिली.